।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

# पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे

४८/१ अ, एरंडवणा, पौड रोड, पुणे - ४११ ०३८
Website - www.pdeapune.org Email – honsecretary@pdeapune.org

जा.क्रं.पुजिशिमं/संगणक /२०१८-१९/ २०१८ दि. - 3 APR 2019

प्रति,
मा.प्राचार्य -

१) प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी
२) अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर.
३) बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी
४) अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय, ओतूर
५) अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट
६) वाघीरे महाविद्यालय, सासवड
७) शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर

**विषय:- नवीन ERP Computer System प्रशिक्षणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, संस्थेच्या सर्व महाविद्यालयांतील व विद्यालयांतील कामकाज संगणकीकरणाच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून मे.डिव्हीनिटी इंडिया प्रा.लि. यांचेमार्फत नवीन ERP Computer System राबविण्याचे निश्चित झाले आहे. त्यादृष्टीने याबाबतचे प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे नियोजन केलेले आहे.

| अ.नं. | प्रशिक्षणाचे ठिकाण | प्रशिक्षण दिनांक | सहभागी शाखा |
|---|---|---|---|
| ०१. | प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी | ०५/०४/२०१९ स.१०.३० वा. पासून दिवसभर | १) प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी<br>२) बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी<br>३) अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालय, ओतूर<br>४) अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट |
| ०२. | अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर | ०८/०४/२०१९ स.१०.३० वा. पासून दिवसभर | १) अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर<br>२) वाघीरे महाविद्यालय, सासवड<br>३) शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर |

वरील प्रशिक्षणासाठी आपल्या शाखेतील ऑनलाईन प्रवेश, आर्थिक व ग्रंथालयासंबंधी प्रशासकीय कामकाज करणाऱ्या सेवकांनी ग्रंथपालांसह वरीलप्रमाणे नमूद केलेल्या प्रशिक्षणाचे ठिकाणी व वेळेत उपस्थित रहावे. तसेच सदरच्या प्रशिक्षणासाठी येतांना त्यांचेसोबत सन २०१८-१९ या वर्षाच्या शाखेतील आवश्यक रेकॉर्डसह उदा.जनरल रजिस्टर, फी रजिस्टर, विद्यार्थ्यांची वर्गनिहाय व विषयनिहाय यादी, याप्रमाणे अनुदानित व विनाअनुदानित विभागांची स्वतंत्रपणे माहिती सोबत Excel Worksheet मधील Soft Copy स्वरूपात आणावी. तसेच महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांचे विभाग, वर्ग व विषयनिहाय माहिती खालील नमून्यात तयार करून सोबत आणावी.

| Sr.No. | Faculty | Course | Compulsory Subjects | Optional Subjects |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |

तरी आपल्या शाखेतील ज्युनियर, सिनिअर व पी.जी. विभागाची वरीलप्रमाणे माहिती सोबत येतांना घेऊन यावी. सदर प्रशिक्षणासाठी शाखेतील संबंधित प्रशासकीय स्टाफने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. सदरचे प्रशिक्षण महत्वाचे असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारची सबब चालणार नाही. त्यादृष्टीने कार्यवाही करावी.

कळावे.

मानद सचिव
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे.

प्रत:-अ) मा.प्राचार्य
१) प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी
२) अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर

आपणांस कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे **ERP Computer System** प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातील एक संगणक लॅब उपलब्ध करून दयावी. तसेच त्यांचे चहापान व अल्पोपहाराची व्यवस्था करावी. त्यासाठी येणाऱ्या खर्चास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल संस्था कार्यालयास पाठविण्यात यावा. त्यानुसार कार्यवाही करावी.

ब) मा.संचालक, डिव्हीनिटी इंडिया प्रा.लि., पुणे
यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना..